## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1980

## THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS (TEMPORARY FURTHER POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO ELECTIONS TO MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY) ACT, 1980.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती, दिनांक ३० जुलै १९८० रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोत्रे,**
सचिव, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1980

## AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY FURTHER POSTPONEMENT OF ELECTIONS TO VILLAGE PANCHAYATS DUE TO ELECTIONS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २ ऑगस्ट १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

### महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका तात्पुरत्या आणखी लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.

१९५९ चा मुंबई ३.
१९८० चा महाराष्ट्र ३.

**ज्याअर्थी,** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या ग्राम-पंचायतीच्या निवडणुका, त्यावेळी होणार असलेल्या, लोकसभेच्या निवडणुकांमुळे तात्पुरत्या लांबणीवर टाकण्याकरिता महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाने महाराष्ट्र ग्रामपंचायती (लोकसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८० (यात यापुढे ज्याचा निर्देश "निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबतचा अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा अधिनियमित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबतच्या अधिनियमाच्या कलम ३ च्या आधारे उक्त पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका ३१ मार्च १९८० पर्यंत लांबणीवर टाकण्यात आल्या होत्या ;

**आणि ज्याअर्थी,** राष्ट्रपती यांनी दिनांक १७ फेब्रुवारी १९८० च्या **भारत सरकारच्या असाधारण राजपत्रातील** भारत सरकारच्या गृहमंत्रालयाची अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४६(ई) हिच्यासह प्रसिद्ध करण्यात आलेल्या उद्घोषणेद्वारे इतर गोष्टींबरोबरच, महाराष्ट्र राज्याची विधानसभा विसर्जित केली ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका घेण्याच्या प्रयोजनाकरिता, १ जानेवारी १९८० ह्या अर्हताकारी तारखेस अनुलक्षून महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या विशेष रीत्या सुधारण्यासाठी निवडणूक आयोगाकडून निदेश देण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेशांनुसार सुधारण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्यांच्या आधारे ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेणे व त्या प्रयोजनासाठी उक्त पंचायतींच्या निवडणुका आणखी लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त पंचायतींच्या निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना व त्यांच्या कर्मचारीवर्गास आणि इतर अधिकाऱ्यांना आपले सर्व लक्ष महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या सुधारण्यावर आणि उक्त विधानसभेच्या निवडणुका घेण्यावर केंद्रित करणे आवश्यक होते या कारणासाठीही उक्त पंचायतींच्या निवडणुका आणखी लांबणीवर टाकणे आवश्यक वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १०, पोट-कलम (२) १९५९
अन्वये, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींसाठी, त्यांची गावातील लोकसंख्या लक्षात चा
घेऊन जागा राखून ठेवणे आवश्यक होते ; मुंबई
३.

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित समाजाच्या व्यक्तींचा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या प्रवर्गात समावेश करण्याचा प्रश्न विचारात घ्यावयाचा होता व त्या कारणासाठीही उक्त पंचायतींच्या निवडणुका आणखी लांबणीवर टाकणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** राष्ट्रपती यांनी दिनांक १७ फेब्रुवारी १९८० च्या उक्त उद्घोषणेद्वारे महाराष्ट्र राज्य शासनाची सर्व कार्ये आणि उक्त राज्याच्या राज्यपालांकडे निहित असलेल्या व राज्यपालांकडून वापरल्या जाणाऱ्या सर्व शक्ती स्वत:कडे घेतलेल्या होत्या ;

**आणि ज्याअर्थी,** राष्ट्रपती यांनी उक्त उद्घोषणेद्वारे स्वत:कडे घेतलेली महाराष्ट्र राज्य शासनाची सर्व कार्ये आणि संविधानानुसार उक्त राज्याच्या राज्यपालांकडे निहित असलेल्या व राज्यपालांकडून वापरल्या जाणाऱ्या सर्व शक्ती यांचा उक्त राज्यपालांनाही राष्ट्रपतींच्या अधीक्षणाच्या, निदेशांच्या आणि नियंत्रणाच्या अधीन राहून वापर करता येईल असा राष्ट्रपती यांनी त्याच तारखेच्या **भारत सरकारच्या असाधारण राजपत्रातील** भारत सरकारच्या गृहमंत्रालयाची अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४७ (ई) हिच्यासह प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे आणखी निदेश दिलेला होता ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू नसताना राज्यपाल यांनी वापरावयाची अध्यादेश प्रख्यापित करण्याची शक्ती संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये राज्यपाल यांच्याकडे निहित करण्यात आलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त उद्घोषणेच्या खंड (क), उपखंड (चार) अन्वये संविधानाच्या अनुच्छेद २१३ मधील राज्याच्या राज्यपालांच्या व विधानमंडळाच्या किंवा त्याच्या सभागृहाच्या संबंधातील निर्देश अनुक्रमे राष्ट्रपतींच्या व संसदेच्या किंवा तिच्या सभागृहांच्या संबंधातील निर्देश आहेत, असे समजण्यात यावयाचे होते ;

**आणि ज्याअर्थी,** संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांनी उक्त पंचायतींच्या निवडणुका आणखी लांबणीवर टाकण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे
आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झालेली होती ; आणि १९८०
म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, संविधानाचा अनुच्छेद २१३ चा खंड (१) आणि पूर्वोक्त चा
आदेश क्र. जी. एस. आर. ४७(ई) द्वारे त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र महा.
ग्रामपंचायती (महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या आणखी लांबणीवर अध्या.
टाकणे) अध्यादेश १९८० हा दिनांक ३१ मार्च १९८० रोजी प्रस्थापित केला ; २.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे आता राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत. १. (१) या धिनियमास महाराष्ट्र ग्रामपंचायती (महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या आणखी लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक ३१ मार्च १९८० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो ३१ मार्च १९८१ हा दिवस धरून त्या तारखेपर्यंत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील व नंतर समाप्त होईल. हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर तो जणू महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित झाला असल्याप्रमाणे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ त्यास लागू होईल.

१९०४ चा मुंबई १.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "प्रशासक" म्हणजे, पंचायत अधिनियमाच्या कलम १६०, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेला प्रशासक आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम १४५, पोट-कलम (२), खंड (ब) किंवा कलम १५१, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ब) "पंचायतीची निवडणूक" म्हणजे, पंचायतीच्या सदस्याची निवडणूक, परंतु त्यात सरपंचाच्या किंवा उप सरपंचाच्या निवडणुकींचा समावेश होत नाही ;

(क) "पंचायती" म्हणजे, पंचायत अधिनियमान्वये स्थापन केलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणारी पंचायत;

१९५९ चा मुंबई ३. (ड) "पंचायत अधिनियम" म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.

पंचायतींच्या विवक्षित निवडणुका तात्पुरत्या आणखी लांबणीवर टाकणे आणि पंचायतींचे सदस्य व प्रशासक यांचा पदावधी वाढवणे.

३. पंचायत अधिनियमामध्ये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमामध्ये किंवा उप-विधी-मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३१ मार्च १९८१ या दिवसासह त्या तारखेपर्यंतच्या किंवा राज्य शासन कलम १, पोट-कलम ३ अन्वये शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा केला आहे) कोणत्याही पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक आणि कोणत्याही पंचायतीमधील नैमित्तिक रिकामी होणारी जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ब) या अधिनिमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या तारखेस पदावर असणारे (मग त्यांचा पदावधी उक्त कालावधीत कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा उक्त तारखेस किंवा त्या तारखेनंतर संपणार असो) कोणत्याही पंचायतीचे सदस्य (मग ते निवडलेले किंवा नेमलेले असोत) किंवा कोणत्याही पंचायतीचा प्रशासक किंवा पंचायतीचे प्रशासक यांचा (कोणत्याही वाढीव पदावधीसह) पदावधी यथास्थिती, वाढवण्यात आल्याचे किंवा वाढवण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल; आणि असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक उक्त कालावधीत पद धारण करीत राहील :

परंतु, सदस्यांचा किंवा प्रशासकांचा या कलमाद्वारे अशा रीतीने वाढवण्यात आलेला पदावधी संपल्यानंतर, ते पुनर्रचित पंचायतीच्या गणपूर्ती होईल अशा पहिल्या सभेपर्यंत पदावर राहतील.

**ज्यांचा पदावधी वाढवलेला आहे त्या सदस्यांच्या व प्रशासकांच्या शक्ती आणि विवक्षित कृत्ये विधिग्राह्य असणे.**

४. लगतपूर्ववर्ती कलमाखाली ज्यांचा पदावधी यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे मानण्यात आले आहे किंवा वाढवण्यात आला आहे असे सर्व पंचायत सदस्य व सर्व पंचायत प्रशासक हे वाढीव कालावधीत देखील (मग या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी किंवा त्यानंतर असोत) असे सदस्य किंवा यथास्थिति प्रशासक म्हणून असलेल्या सर्व शक्तींचा वापर करण्यास आणि त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल; आणि उक्त कालावधीत अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने केलेले कोणतेही कृत्य हे, केवळ पदावधी वेळेवर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा अन्य प्रकारे तो रीतसर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा वाढीव कालावधीमध्ये पंचायत सदस्य किंवा प्रशासक हा, यथास्थिति पंचायत सदस्यांच्या किंवा प्रशासकाच्या सर्व शक्तींचा वापर करू शकत नव्हता किंवा त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकत नव्हता, केवळ याच कारणावरून विधि अग्राह्य (बेकायदेशीर) समजण्यात येणार नाही; किंवा कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही.

**विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा वाढीव पदावधी संपल्यानंतर नवीन पंचायती पुन्हा स्थापन करण्यासाठी करावयाची व्यवस्था.**

५. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख उक्त कालावधी संपण्यापूर्वीची तारीख असेल) जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकारी, या अधिनियमानुसार ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला आहे अशा विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर शक्यतो लवकर पंचायत अधिनियम व त्याखाली केलेले नियम व उप-विधी यांनुसार नवीन पंचायती स्थापन करण्यासाठी व्यवस्था करतील.

**सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३ लागू असणे.**

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद केलेल्या गोष्टीं व्यतिरिक्त, पंचायत अधिनियमाच्या तरतुदीसंबंधात पंचायतींना इतर सर्व बाबतीत लागू होतील.

**सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश २ याचे निरसन व व्यावृत्ती.**

७. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायती (महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या आणखी लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश २.

(२) अध्यादेश अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा काढलेला कोणताही आदेश धरून) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार केली किंवा यथास्थिति काढली असल्याचे मानण्यात येईल.

**अडचणी दूर करणे.**

८. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास प्रसंग पडेल त्याप्रमाणे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असल्याचे आढळून येईल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे करता येईल.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**

भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.